—: जाहिर निविदा :—

जिल्हा न्यायालय अहमदनगर यांच्या अधिपत्याखालील असलेले अकोले येथील अकोले ता. अकोले जि. अहमदनगर येथे नविन स्थापन होणा—या दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, न्यायालयाकरिता आवश्यक असणारे डायस व निजीकक्ष यामध्ये ॲल्युमिनीअमचे पार्टीशन, दरवाजा तसेच डायसचे समोरील अर्धा भागापर्यंतचे लाकडी पार्टीशन तयार करुन खरेदी करणेकरिता अहमदनगर येथील स्थानिक बाजारपेठेतील अधिकृत विक्रेत्यांकडून दरपत्रके मागविण्यात येत असून त्यासाठी खालील अटी व शर्ती लागू राहतील.

त्याबाबतच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :—

१. आपल्या फर्मचा परवाना असणे आवश्यक आहे.
२. आपले फर्मचे नावाने पॅन व टॅन असणे आवश्यक आहे.
३. आपल्या फर्मचे नावाने जी.एस.टी. असणे आवश्यक आहे.
४. आपल्या वस्तुंचे दरपत्रक सिलबंद पाकीटात देणे आवश्यक आहे.
५. सिलबंद पाकीटावर दरपत्रक कशाचे आहे ते लिहिणे आवश्यक आहे.
६. सिलबंद पाकीटावर मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय, डि.एस.पी. चौक, अहमदनगर यांचे नाव व पत्ता लिहिणे आवश्यक आहे.
७. सिलबंद पाकीटे स्वत: अथवा आपल्या प्रतिनिधी/पोस्टाद्वारे या कार्यालयाच्या आवक टेबलकडे आणून दयावेत.
८. दरपत्रकामध्ये यादीतील सर्व वस्तुचे दर लिहिणे आवश्यक आहे, अपूर्ण दरपत्रक नाकारण्याचा अधिकार राखून ठेवण्यात आलेला आहे.
९. सदरहु दरपत्रक दिनांक २९/१२/२०२५ रोजी सायंकाळी ०६—०० पर्यंत देणे आवश्यक आहे.
१०. तत्पर व जलद सेवा देणा—या फर्मना प्राधान्य देण्यात येईल.
११. दरपत्रकाबाबत दबाव आणण्याचा प्रयत्न करु नये अन्यथा दरपत्रक नाकारण्याचा अधिकार जिल्हा न्यायालय, अहमदनगर यांचेकडे राखून ठेवण्यात आलेला आहे.
१२. कोणतेही कारण न देता दरपत्रके अस्विकार करणेचा अधिकार जिल्हा न्यायालय, अहमदनगर या कार्यालयाने राखून ठेवलेला आहे.
१३. ज्यांचे दरपत्रक वरील अटींचे व शर्तीची पूर्तता करुन कमी दराचे असेल त्यांचेच दरपत्रक स्विकारण्यात येईल.

सदरचे दरपत्रक सोमवार दिनांक २९/१२/२०२५ रोजी सायंकाळी ०६—०० पर्यंत मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय, डि.एस.पी. चौक, अहमदनगर यांचे कार्यालयात आणून देणे आवश्यक आहे.

हुकूमावरुन,

अधीक्षक,
लेखा व वित्त विभाग,
जिल्हा न्यायालय, अहमदनगर

जिल्हा न्यायालय, अहमदनगर
दिनांक :— १७/१२/२०२५

(शिक्का: जिल्हा न्यायालय, अहमदनगर)

प्रत :—

१. मा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर,
२. मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर
३. मा. कोषागार अधिकारी, अहमदनगर
४. मा. आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
५. जिल्हा न्यायालय, अहमदनगर ई—कोर्ट साईट

D:\Shripad\DARAPATRAK YADI 2025-2026 Jahir Nivida odt